संशोधन आराखडा

‘अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी विभागाच्या भूमिकेचा अभ्यास’

विशेष संदर्भ- नांदेड जिल्हा(कालखंड 2010 ते 2025)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्रविषयातील

पीएच.डी.पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या प्रबंधाचा गोषवारा

(**डिसेंबर** - 2025)

संशोधक

सतिश मोहनराव हंबर्डे

(एम.ए.अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.सुरेश चंद्रकांत मेहेत्रे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

बी.रघुनाथ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,परभणी.

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

‘अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी विभागाच्या भूमिकेचा अभ्यास’

विशेष संदर्भ- नांदेड जिल्हा (कालखंड 2010 ते 2025)

❖ **प्रस्तावना:-**

जगातील कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशाच्या शेतीक्षेत्रावर अवलंबुन दिसून येतो, जगात प्रगत देशांमध्ये शेती व्यवसाय सुधारल्या नंतर उल्लेखनीय प्रगती झालेली दिसून येते. कृषी क्षेत्रात व्यवसायाची वाढ करीत असताना शेतीचा आकार याकडे लक्ष द्यावे लागते. शेतकरी हा जगाचा पोशिंदा म्हणून ओळखला जातो. औद्योगिक क्रांती पूर्वी जगात शेती हाच महत्वपूर्ण व उदरनिर्वाचा व्यवसाय होता. औद्योगिक क्रांती नंतरही आणि सद्यस्थितीतही विकसनशील आणि अविकसित राष्ट्रात कृषी व्यवसायाला अधिक महत्त्व देते.जगभरातील अन्न व्यवस्थे सक्षम बनवण्यासाठी छोटे शेतकरी महत्तपूर्ण आहेत. अन्न आणि कृषी संघटना (FAO) नुसार अंदाजे 600 दशलक्ष अल्पभूधारक शेतकरी 5 एकर (2 हेक्टर) पेक्षा कमी जमिनीवर काम करतात.

स्थानिक समुदायांना परवडणारे, ताजे आणि पौष्टिक अन्न देतात, तरीही त्यांना मर्यादित संसाधने, अयोग्य पायाभूत सुविधा,निधीची कमतरता,लिंगभेद किंवा इतर सामाजिक-आर्थिक घटकांमुळे आव्हानांना सामोरे जावे लागते. शिवाय, अल्पभूधारक शेतकरी अनेकदा उपासमारीने त्रस्त होतात. संयुक्त राष्ट्रसंघाच्या म्हणण्यानुसार जगभरातील अंदाजे 828 दशलक्ष लोकांपैकी सुमारे तीन चतुर्थांश भूकबळी ग्रामीण भागात वास्तव्यास राहतात. त्यापैकी बरेच शेतकरी आहेत,अल्पभूधारक शेतकरी हा जागतिक कृषी उद्योगाचा एक अमूल्य भाग आहे. ज्या राष्ट्रात लोकसंख्या अधिक आहे त्या राष्ट्रात शेती व्यवसायावर अवलंबून असणाऱ्यांची प्रमाण अधिक असते. शेती व्यवसाय बांधिलकी जपणाऱ्या देशात अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक असून दिसते. त्यामुळे कृषी व्यवसायात आवश्यक असलेले तंत्रज्ञान ,अवजारे, बियाणे,किटकनाशके व जलसिंचनाच्या सुविधा इत्यादींचा वापर करता येत नाही. याचा विपरीत परिणाम शेती व्यवसायावर होतो. जास्त लोकसंख्या असलेल्या राष्ट्रात शेतीची धारण क्षमता किती आहे हे पाहणे आवश्यक ठरते.

अल्पभूधारक शेतकरी म्हणजे असे शेतकरी की, ज्यांची कृषिधारक क्षमता दोन हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी आहे. ज्या शेतीधारण क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान, अवजारे, बियाणे इत्यादींचा योग्य वापर करण्यात इतपत जमीन नसलेले शेतकरी होय. थोडक्यात कमी शेती असलेला शेतकरी म्हणजेच अल्पभूधारक शेतकरी होय. या भूमी धारण क्षेत्रानुसार सुधारकांचे वर्गीकरण सामान्यतः अल्पभूधारक शेतकरी, मध्यम शेतकरी व मोठे शेतकरी असे वर्गीकरण करता येते.भारतामध्ये बहुसंख्य जनता ही शेती व्यवसायावर उपजीविका करते. सन 2014 मध्ये भारताची सुमारे 54 टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून होती. मुख्यतः लहान शेतकरी, भूमिहीन मजूर आणि कुटुंब चालवणाऱ्या लघु शेतकऱ्यांचा समावेश होता तर 2024 पर्यंत ही टक्केवारी कमी होऊन अंदाजे 42 ते 45% च्या दरम्यान आली आहे हा बदल विविध घटकांमुळे झाला असे दिसून येते. जरी कृषी व्यवसायातील हे अवयवाचे प्रमाण कमी होत असले तरी द्वितीय व तृतीय क्षेत्रापेक्षा उपजीविकेचे साधन म्हणून कृषी व्यवसायाकडे पाहिले जाते.शेतीचा आकार आणि उत्पादकता यात परस्पर संबंध आहे. भारतात उपलब्ध असलेली शेतजमीन व लोकसंख्या हे दोन घटक जुळत नाहीत. जमिनीचा पुरवठा स्थिर असतो. लोकसंख्या

मात्र वाढत जाते. परिणामी जमिनीची मागणी वाढून भारत क्षेत्राचा आकार लहान होत जातो. अशा जमिनीच्या लहान तुकड्यावर आधुनिक पद्धतीने शेतकरी शेती करू शकत नाही. कारण नवीन उत्पादन तंत्र, संकरित बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, जलसिंचनाच्या सुविधा यांचा वापर योग्य प्रमाणावर करण्यात शक्य होत नाही. त्यामुळे शेतीच्या उत्पादकतेवर व त्याच्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर प्रतिकूल परिणाम पडतो.

शेती व्यवसायातील सामाजिक बाजू पाहताना.उदाहरण- सर्व समुदायात आढळून येतात. जशी समुदायची उतरंड असते, अगदी त्याचप्रमाणे कनिष्ठ समाजाच्या समुदायात अल्पभूधारकता जास्त दिसून येते. भारतात विसाव्या शतकांच्या प्रारंभिक जन्म व मृत्यू दर समान असल्यामुळे लोकसंख्या वाढीचा दर अतिशय कमी होता, मात्र नंतरच्या काळात हळूहळू औषध व चिकित्सा क्षेत्रातील प्रगती, सुविधा आणि जीवन विस्तरातील वाढीमुळे वसाहतींच्या साधनांतील प्रगतीमुळे संक्रमक रोगावर नियंत्रण झाले मृत्यू दर कमी झाला किमान आयुर्मान वाढेल व त्या प्रमाणात जन्मदर कमी झाला नाही. परिणामी लोकसंख्येचा विस्फोट झाला व अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या. भारताचे एकूण राष्ट्रीय उत्पादनात कृषी क्षेत्राचा वाटा 1950 ते 51 ला 55.3% इतका होता तर इ.स. 2022 ते 2023 ला 18.2% इतका झाला, मात्र यासाठी औद्योगिक आणि सेवा क्षेत्रात झालेली वाढ कारणीभूत आहे, असे असले तरी ही औद्योगिक क्षेत्रासाठी लागणारा कच्चा माल हा कृषी क्षेत्रातून पुरवठा केला जातो. त्याचबरोबर कृषी क्षेत्र हेच आजही सर्वाधिक रोजगार पुरवनारे क्षेत्र आहे.

❖ **साहित्य सर्वेक्षण**:-

साहित्य सर्वेक्षण विषयाच्या अनुसरून यापूर्वी झालेले संशोधन याचा अभ्यास केला जातो. या अभ्यासाचा वापर करून संशोधांनाला पुढील दिशा देण्याचे काम केले जाते. त्यामुळे पूर्व संशोधांनाचा आढावा घेणे फार महत्वाचे आहे. साहित्य सर्वेक्षण हे नेहमी प्रस्तावणे नंतर येते,ते नेहमी प्रकरण क्रमांक दोन मध्ये मांडले जाते.

1. कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समष्या (2005) हा शोध निबंध डॉ. एल.एच.पाटील यांनी लिहला असून या निबंधामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्या मांडण्यात आल्या आहेत. अल्पभूधारकतेमुळे शेतकरी कोणत्या प्रकारच्या सोई सुविधापासून वंचित आहे ते या शोध निबंधामध्ये मांडण्यात आले आहे.
2. आर.डी.जाधव यांनी (2021) मध्ये मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक अध्यायन विशेष संदर्भ नांदेड जिल्हा या विषयावर अभ्यास केला असून त्यात त्यांनी मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जीवन व उदरनिर्वाह या वर अभ्यास केला आहे.
3. एस.ए.कर्डक यांनी (2020) मध्ये ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्या आणि उपाययोजना या विषयावर अभ्यास केला आहे. त्यात त्यांना असंघटित शेती,लहान शेतजमीन,साक्षरता,सिंचन सुविधाचा अभाव,खेड्यातील बेरोजगारी,पिढीतील अंतरामुळे ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जीवनमानवर पडलेला अभ्यास केला आहे त्यात वरील घटक प्राप्त झाले आहेत.

❖ महाराष्ट्रातील कृषी विषयक स्थिती व स्वरूपः-

महाराष्ट्र हे भारतातील महत्त्वाचे घटकराज्य आहे. महाराष्ट्रात 36 जिल्ह्याचा समावेश होतो. इ.स.1971 च्या जनगणनेनुसार 05 कोटी 04 हजार इतकी होती ती सन 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या 11,23,74,333 (सुमारे 11.24 कोटी) आहे. महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र 3,07,713चौ.कि,मी. आहे.त्यातील केवळ 56.81% कृषी क्षेत्रा खाली आहे. महाराष्ट्रातील कृषी व्यवसायात अल्पभूधारकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. महाराष्ट्रातील कृषी व्यवस्थेत प्रामुख्याने जमीनदार ,मध्यम शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी आणि अल्प भूधारक शेतकऱ्यांचा समावेश होतो.

❖ मराठवाड्यातील कृषी विषयक स्थिती व स्वरूपः-

17 सप्टेंबर 1948 ला तात्कालीन हैदराबाद संस्थानातील मराठवाडा हा मराठी भाषीकांचा प्रदेश हैदराबाद संस्थानासह निजामांच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाला, तात्कालीन मराठवाड्यात पाच जिल्ह्यांचा समावेश होता. त्यात औरंगाबाद (संभाजीनगर), उस्मानाबाद(धारशीव), नांदेड, बीड आणि परभणी पुढे 1981 ला औरंगाबाद जिल्ह्यांचे विभाजन होऊन जालना, 1982 ला उस्मानाबाद जिल्ह्यातील विभाजन होऊन लातूर तर 1999 ला परभणी जिल्ह्याचे विभाजन होऊन हिंगोली जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. मराठवाड्यातील 85% लोकसंख्या ही शेती व्यवसायावर अवलंबून आहे . तसेच मराठवाड्यातील एकूण उत्पन्नापैकी 68% उत्पादन हे शेती व्यवसायाचे आहे. महाराष्ट्राच्या कृषी उत्पादनाच्या तुलनेत मराठवाड्याचे कृषी उत्पादन हे 17.8% आहे.

मराठवाडा हा मागासलेला विभाग असल्यामुळे शेती हाच मराठवाड्यातील प्रमुख व्यवसाय आहे. मराठवाड्यातील एकूण जमीन धारकांपैकी 24.3 अति अल्पभूधारक, 33.3 अल्पभूधारक शेतकरी आहेत. मराठवाड्यातील एकूण जमीन धारकांपैकी 2/3 शेतकऱ्यांकडे सरासरी 1.1 हेक्टर जमीन आहेत. याहून हे स्पष्ट होते की मराठवाड्यात शेती व्यवसायात अल्प शेतकऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी विभागाच्या भूमिकेचा अभ्यास यावर अध्ययन करण्याचे निश्चित केले आहे.

❖ नांदेड जिल्हा कृषी विषयक स्थिती :-

नांदेड जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागात स्थित आहे.नांदेड, मुदखेड, हदगाव, उमरी,किनवट, माहुर, भोकर, मुखेड, बिलोली, देगलूर, धर्माबाद, अर्धापूर, नायगाव(खैरगाव), कंधार, लोहा, आणि हिमायतनगर हे तालुके आहेत. नांदेडच्या उत्तरेस यवतमाळ जिल्हा आहे,दक्षिणेकडे कर्नाटक राज्यातील बीदर जिल्ह्याची सीमा आहे,पूर्वेस तेलंगणाच्या निर्मल आणि कामारेड्डी जिल्ह्यांशी सीमा लागून आहे आणि पश्चिमेस परभणी आणि लातूर जिल्हे आहेत.नांदेड जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ सुमारे 10,502 चौ.किमी आहे.2011 च्या जनगणनेनुसार, नांदेड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 30,84,413 होती. यामध्ये पुरुषांची लोकसंख्या 15,35,113 आणि महिलांची लोकसंख्या 15,49,300 होती.नांदेड जिल्ह्यातील लागवडीखालील

क्षेत्रफळ सुमारे 7,60,000 हेक्टर आहे. यामध्ये खरीप आणि रब्बी हंगामातील पिकांचा समावेश आहे तर नांदेड जिल्ह्यात बिगर लागवडीखालील क्षेत्रफळ सुमारे 2,42,000 हेक्टर आहे. बिगर लागवडीमध्ये जंगले, नदीचे काठ, वाळवंटी क्षेत्र आणि इतर वापरातील क्षेत्रांचा समावेश होतो.

नांदेड जिल्ह्यात शेतकऱ्यांची वर्गवारी त्यांच्या भूधारक प्रमाणे केली जाते. 2011 च्या कृषी जनगणनेनुसार, शेतकऱ्यांची वर्गवारी केली असता अल्पभूधारक शेतकरी (0-2 हेक्टर) सुमारे 65-70%,मध्यम शेतकरी (2-10 हेक्टर) सुमारे 25-30% आणि मोठे शेतकरी (10 हेक्टरपेक्षा जास्त) सुमारे 5-8% एवढी आहे.2011 च्या जनगणनेनुसार, नांदेड जिल्ह्यात अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या सुमारे 2,00,000 (2 लाख) आहे. या शेतकऱ्यांचे क्षेत्रफळ 0 ते 2 हेक्टरच्या दरम्यान होती.

- **अल्पभूधारक शेतकरी व्याख्या व अर्थ**:-

कोणत्याही देशाचा विकास हा देशातील कृषी, उद्योग व सेवा क्षेत्र या सर्वांच्या विकासावर अवलंबून असतो. प्रत्येक क्षेत्राचा विकासा परस्परावर अवलंबून असतो.भारतामध्ये 2002 ते 2003 मध्ये 1.4 हेक्टर एवढे होते तर भारतामध्ये 2014 ते 2015 मध्ये एका शेतकऱ्यांसाठी उपलब्ध शेती योग्य जमिनीचे क्षेत्रफळ सुमारे 1.08 हेक्टर होते . शेतीच्या कमी धारण क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान, भांडवल खते, बी-बियाणे, किटकनाशके व जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीस मर्यादा पडतात व आर्थिक स्थिती कमजोर होते.

- **व्याख्या**:-

“ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे क्षेत्रफळ 2 हेक्टरच्या आत असते अश्या शेतकऱ्यास अल्पभूधारकशेतकरी म्हणतात”.

" अल्पभूधारक म्हणजे आपल्या धारण क्षेत्रात नवीन उत्पादन तंत्र, बी-बियाणे, कीटकनाशके व जलसिंचन या सारख्या बाबींचा योग्य वापर न करता येण्याजोगे लहान जमिनीचे क्षेत्र होय."

थोडक्यात अल्पभूधारक म्हणजे कसण्यासाठी कमी जमीन उपलब्ध असलेला शेतकरी होय या अल्पभूधारक स्थितीमुळे आर्थिक स्थिती उंचावता येत नाही.

- **संशोधनाचा कालखंड** :-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांनी अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी विभागाच्या भूमिकेचा अभ्यास करण्यासाठी कालखंड 2010 ते 2025 या कालावधीची निवड केली आहे.

- **समस्यासूत्रण :-**

नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची आर्थिक विकासाची स्थिती अत्यंत दयनीय स्वरूपाचे आहे. औद्योगिकीकरणा मध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या मालाला योग्य तो हमीभाव मिळत नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीचे तुकडीकरण वाढत आहे, जंगलातील जमीन,लँड सिलिंग ऍक्ट 1961 , वारसा हक्क 1956 , नवीन जमिनी घेतलेले व शासकीय जमिनीवरील (गायरान) अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या वाढत आहे.यात नवीन उत्पादन तंत्र, बी-बियाणे, कीटकनाशके व जलसिंचन याचा योग्य वापर करता येत नाही.

- **संशोधन विषयाचे महत्त्व:-**

भारतातील अनेक उद्योग शेतीवर अवलंबून आहेत. सर्वाधिक रोजगार क्षमता शेती व्यवसायातच आहे. असे असले तरी सध्या परिस्थितीचा विचार करता महाराष्ट्र व मराठवाड्यातील शेती व शेतकऱ्यांची स्थिती बिकट बनत चाललेली आहे. त्यासाठी अनेक घटक जबाबदार आहे. या जबाबदार घटकांचा संशोधक अभ्यास करणार आहे.संशोधकाच्या अभ्यासातून अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासाचे प्रश्न त्यांच्या समस्या, कृषी विषयक योजनातील अंमलबजावणीतील अडथळे, नैसर्गिक आपत्ती व त्यांचे परिणाम इत्यादी घटकांची उकल होणार आहे. याचा फायदा, जिल्हा नियोजन विभाग, कृषी विभाग,शासकीय कृषि विषयक धोरण तयार करण्यासाठी मदतपूर्ण ठरणार आहे.

- **विषयनिवडीचे महत्त्व :-**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान आहे. भारताचा विकास हा शेती विकासावरच अवलंबून आहे. परंतु आधुनिक काळात कृषी क्षेत्राच्या उत्पादन वाढीचा वेग पाश्चिमात्य राष्ट्रांच्या तुलनेत खूपच कमी आहे. कृषी क्षेत्राचे उत्पादन वाढवायचे असेल तर कृषी धारकांच्या समस्या व प्रश्न सुटवणे आवश्यक आहेत. त्या दृष्टिकोनातून भारतीय क्षेत्रांच्या विशेषता भारतीय शेती व्यवसायात सर्वाधिक संख्येने असणाऱ्या व विविध समस्येने ग्रस्तलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये येणाऱ्या अडथळ्यांची निवारण करणे आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून भारतात शेतकऱ्यांच्या विशेषता भारतीय शेती व्यवसायात सर्वाधिक संख्येने असणाऱ्या व विविध समस्येने ग्रस्तलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये समस्या शोधून त्यावर उपाय सुचविण्यासाठी प्रस्तुत विषय निवडलेला आहे.

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्येची कारणे समजतील त्या अनुषंगाने त्यावर उपाय सुचविण्यात येतील त्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये सोडवणूक होण्यासाठी कारणे समजतील त्या अनुषंगाने त्यावर उपाय सूचवण्यात येतील त्यामुळे साहजिकच अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये समस्येची सोडवणूक होण्यास मदत होणार आहे आणि पर्यायाने राष्ट्राच्या कृषी उत्पादनात वाढ होईल.

❖ संशोधनाची उद्दिष्टे :-

1. नांदेड जिल्ह्यातीलशेतकऱ्यांची अल्पभूधारकता निर्माण होण्याची कारणे तपासणे.
2. नांदेड जिल्ह्यातीलअल्पभूधारकताशेतकऱ्यांचे आर्थिक उत्पादन तपासणे.
3. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाच्या सबंधित माहिती तपासणे.
4. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषि विभागाची सहकार्य स्थिति तपासणे.
5. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषि विषयक योजना,आयोग,समित्या यांची अंमलबजावणी तपासणे.

❖ संशोधनाची गृहीतकृत्य:-

1. नांदेड जिल्ह्यातीलशेतकऱ्यांच्या अल्पभूधारकता संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे.
2. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारकता कारणाने शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पादनात वाढ होताना दिसून येत नाही.
3. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकरी योग्य माहितीच्या अभावामुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करताना दिसून येत नाही.
4. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषि विभागाचे निम्न सहकार्य होताना दिसून येते.
5. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषि विषयक योजना,आयोग,समित्या यांची शिफारशी अंमलबजावणीसाठी अडथळा येते.

❖ संशोधन पद्धती:

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी सामाजिकशास्त्रातील मिश्रित म्हणजेच संख्यात्मक व गुणात्मक संशोधन पद्धतीचा तसेच मूल्यमापनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे .तथ्य संकलनासाठी प्राथमिक सामग्री आणि दुय्यम सामग्री या दोन्ही प्रकारांचा अवलंब करण्यात येणार आहे.

तथ्य संकलनाच्या पद्धती :-

तथ्य संकलनाच्या दोन पद्धती आहेत.

1) **प्राथमिक पद्धत** :-

प्रस्तुत विषयाच्या संशोधन कार्याची अचुक माहिती मिळविण्यासाठी प्राथमिक पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. प्राथमिक पद्धती मध्ये प्रश्नावली या साधनाचा वापर महिती संकलनासाठी करण्यात येईल. नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतक-यांकडून प्रश्नावली भरून घेण्यात येईल.

2) **दुय्यम पद्धत** :-

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक सामग्री बरोबरच दुय्यम सामग्रीचा वापर करून सामग्रीचे संकलन केले जाईल. या मध्ये प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, दैनिके, मासिके, कार्यालयीन अहवाल,शासकीय कृषि विषयक अहवाल व इंटरनेट वरील सबंधीत माहिती इत्यादी साधनांचा आधार घेण्यात येईल.

नमुना निवड :-

प्रस्तुत संशोधन प्रक्रियेत नमुना निवड करणे फार महत्त्वाचे आहे. यात गैरसंभाव्य नमुना निवड पद्धती अंतर्गत सहहेतूक नमुना निवड पद्धतीने नमुना निवडला जाईल. नांदेड जिल्ह्यात 16 तालुक्यापैकी अधिक लोकसंख्या असणाऱ्या व पुरेशा प्रमाणात अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण उपलब्ध असणाऱ्या 50 गावांची निवड करण्यात येईल. प्रत्येक गावातून 10 अल्पभूधारक शेतकरी याप्रमाणे 500 नमुना निवड करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:-

नांदेड जिल्ह्यातील बहुतेक अभ्यास हा महत्त्वपूर्ण अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी विभागाच्या भूमिकेचा अभ्यास याबाबत करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनात अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी विभागाच्या भूमिकेच्या स्थितिचा रचनेतील बदलाचा सदरील अभ्यास करणार आहे,सदरील संशोधन हे नांदेड जिल्ह्या पुरतेच मर्यादित असेल.

आकडेवारी विश्लेषण:-

अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी विभागाच्या भूमिकेचा अभ्यास या विषयाच्या संशोधनातील आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी गणितीय आणि भूमितीय साधनांचा वापर करण्यात येईल. जसे वृद्धीदर, सहसंबंध, शेकडेवारी इत्यादी साधनांचा वापर केला जाईल. सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी तक्ते ,आलेख, सारणी इत्यादी साधनांचा उपयोग करण्यात येईल.

❖ **प्रकरणांची रूपरेषा (प्रकरणीकरण)** :-

प्रस्तुत संशोधनाची विभागणी सहा प्रकरणात करण्यात आलेली आहे.

1. **प्रस्तावना** -- या प्रकरणामध्ये विषयास अनुसरून संपूर्ण प्रकारची माहिती या प्रकरणामध्ये मांडण्यात येणार आहे.

2. **संशोधन साहित्याचा आढावा घेणे**:-या प्रकरणामध्येपूर्वी झालेले अभ्यास अहवाल,संशोधन,संशोधन लेख याचा आढावा घेण्यात येणार आहे.

3. **महाराष्ट्र व मराठवाड्यातील कृषीविषयक स्थितीचा अभ्यास**:- या प्रकरणामध्येमहाराष्ट्र व मराठवाड्यातील कृषीविषयक स्थितीचा अभ्यास केला जाणार आहे.

4. **नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठीच्या शासकीय योजनांचा अभ्यास**:- या प्रकरणामध्येजिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठीच्या शासकीय योजनांचा अभ्यास केला जाणार आहे.

5. **नांदेड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी विभागाच्या सहकाऱ्याच्या भूमिकेच्या स्थितीचा आढावा घेणे**.

6. **निष्कर्ष व शिफारशी**

संदर्भ सूची

❖ **संदर्भ सूची** :--

1. https://www.bread.org.in

2.Agriculture research date book, 2004.

3. Economics survey-Drishti IAS

4. कृषी अर्थशास्त्र, डॉ. विजय कवी मंडन, मंगेश प्रकाशन, नागपूर.

5. कृषी अर्थशास्त्र, डॉ. निता वाणी, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

6. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी,2005.

7. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी,2011.

8. मराठवाडा विकास दिशा आणि गती संपादकस. मा. दर्गे.

9. डॉ.शशिकांत अन्नदाते व स्वातीअन्नदाते – (2019)-संशोधन पद्धती, के'सागर पब्लिकेशन.

10. आगलावे डॉ. प्रदीप,2020, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्र,विद्याप्रकाशन नागपूर.

11. डॉ.सुनील जाधव,2015, सामाजिक संशोधन पद्धती, प्रथम आवृत्ती.

संशोधक
सतिश मोहनराव हंबर्डे

मार्गदर्शक
प्रा.डॉ.सुरेश चंद्रकांत मेहेत्रे
प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
बी.रघुनाथ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,परभणी.